# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

# प्रकरण पहिले

## विषय प्रवेश

### प्रस्तावना :

आकाराने लहान परंतु आशयाने महान असणाऱ्या ग्रंथांची संख्या, अगदी जगाचे वाङमय् लक्षात घेतले तरी, एकंदरीत कमीच असणार. आधुनिक काळातील अशा अल्पाक्षरी परंतु बृहदाशयी ग्रंथांची संख्या जास्त असेल असे वाटत नाही. अशा पुस्तकांची नोंद घ्यायचीच म्हटले तर कार्ल मार्क्सचा 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो', रस्किनचे 'अन्टु धिस लास्ट', थोरोचे 'सिव्हिल डिसओबिडिअन्स', मेरी वोल्स्टन क्राफ्टचे 'दि व्हिंडिकेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन', जॉन स्टुअर्ट मिल्सचे 'ऑन लिबर्टी', महात्मा गांधींचे 'हिंदस्वराज्य' आणि आचार्य विनोबा भावेचे 'स्वराज्यशास्त्र' अशा काही निवडक पुस्तकांची अथवा पुस्तकरूपाने प्रसिध्द झालेल्या प्रदीर्घ निबंधाची नावे विशेषतः लक्षात येतात. व्यक्तिपरत्वे या ग्रंथनामांमध्ये थोडा–अधिक फरक पडू शकेल. परंतु त्यानंतर ही संख्या फार मोठी होईल असे वाटत नाही. महात्मा गांधींचे 'हिंदस्वराज्य' आणि आचार्य विनोबा भावेचे 'स्वराज्यशास्त्र' या दोन स्वल्पाक्षरी परंतु बृहदाशयी ग्रंथांचा अभ्यास सदर प्रबंधामध्ये करीत आहे.

आधुनिक भारताच्या सामाजिक व राजकीय जीवनात महात्मा गांधी यांनी अनन्यसाधारण असे कार्य केले आहे. महात्मा गांधींनी एक वेगळा दृष्टीकोण स्वीकारून भारताच्या राजकीय व सामाजिक इतिहासाचा अभ्यास केला. स्वराज्य व राज्यसंस्था या

दोन्ही बाबतीत महात्मा गांधींनी मूलगामी विचार मांडले. १९०९ मध्ये महात्मा गांधींनी 'हिंदस्वराज्य' नावाचा ग्रंथ लिहीला. यामध्ये त्यांनी पाश्चात्य संस्कृती आणि सभ्यतेवर प्रखर अशी टीका करून स्वराज्य आणि सुराज्य या संदर्भात मूलगामी असे विचार मांडले. भारतीयांना कशाप्रकारे स्वराज्य हवे यांची मीमांसा या पुस्तकामध्ये केली आहे. या ग्रंथात महात्मा गांधींनी स्वराज्याचा पर्यायी मार्ग मांडण्याचा प्रयत्न केला.

'हिंदस्वराज्य' या ग्रंथाचे चार भागात विभाजन होते. मुख्यतः स्वराज्या बद्दलचे विचार प्रवाह, आधुनिक संस्कृतीची चिकित्सा, संस्कृती व समाज आणि स्वराज्य म्हणजे काय? या संबंधी व्यापक रीतीने चर्चा महात्मा गांधींनी केलेली आहे.

'हिंदस्वराज्य' मध्ये महात्मा गांधी यांनी मांडलेल्या विचारांचा विकास आणि नवा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न आचार्य विनोबा भावे यांनी केला. आचार्य विनोबा भावे हे महात्मा गांधींचे वैचारीक आणि अध्यात्मिक वारसदार होते. विनोबांनी सर्वच क्षेत्रात महात्मा गांधींच्या विचारांचा विकास केला. सर्वोदय, भूदान, स्वराज्य व लोकनीती या विषयांवरील त्यांचे विचार अनेक बाबतीत महात्मा गांधींजींच्या विचारांना पुढे नेतात. कारण विनोबांची दृष्टी श्रेष्ठ मीमांसकाची व तीक्ष्ण बुध्दीच्या भाष्यकाराची होती.

आचार्य विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' हे पुस्तक १९४० च्या कारावासात असताना लिहीले आहे. विनोबांनी 'स्वराज्यशास्त्र' हे पुस्तक आकाराने लहान आणि प्रश्नउत्तराच्या स्वरूपात मांडले आहे. विनोबांनी राजनीतीला लोकनिती हा पर्याय देऊन या पुस्तकात स्वराज्याची मांडणी केली. 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात विनोबांनी पर्यायी राजकीय विचार मांडला. हा विचार मांडत असताना त्यांनी सद्यकालीन समाजापुढे जे

राजकीय व सामाजिक प्रश्न निर्माण झाले होते त्याची चर्चा 'स्वराज्यशास्त्रात' केली आहे. 'हिंदस्वराज्य' मध्ये महात्मा गांधींनी प्रतिपादलेल्या विचारांना मूर्तस्वरूप देण्याचा किंवा पर्यायी राजकीय विचार मांडण्याचा प्रयत्न विनोबा भावे यांनी केलेला आहे.

राजकीय स्वातंत्र्याच्या ५८ वर्षानंतर ही स्वराज्य आणि सुराज्य दोन्हीपासून भारतीय जनता फार दूर आहे. पारतंत्र्यच बरे होते अशी भारतीय समाजाची मानसिकता निर्माण होताना दिसून येते. आजवरच्या इतिहासात कधी नव्हती इतकी भारतीय जनता महात्मा गांधीं आणि आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांच्याकडे पुन्हा वळताना दिसते. राजकीय स्वातंत्र्य आणि भारतीय राज्यघटनेद्वारा आपण स्थापित केलेली लोकशाही राज्यव्यवस्था असताना सुध्दा स्वराज्य व सुराज्य यांच्या पासून भारतीय जनता वंचित का राहीली? याचा वेध महात्मा गांधींचे 'हिंदस्वराज्य' आणि आचार्य विनोबा भावे यांचे 'स्वराज्यशास्त्र' या दोन अभिजात अशा ग्रंथातून घेणे आवश्यक आहे.

महात्मा गांधी यांनी 'हिंदस्वराज्य' या ग्रंथामध्ये मांडलेल्या राजकीय विचारांचा विकास करून आचार्य विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथामध्ये पर्यायी राजकीय विचारांची मांडणी केली आहे. या दोन्ही अभिजात ग्रंथातील विचारांचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात येत आहे.

## पर्यायी गांधींवादी राजकारण याचे विवेचन :

महात्मा गांधी यांनी १९०९ साली 'हिंदस्वराज्य' हा ग्रंथ लिहीला. या ग्रंथात महात्मा गांधींनी आधुनिक संस्कृती, आधुनिक सभ्यता आणि आधुनिक संसदीयशासन पध्दतीवर

प्रखर अशी टीका केले आणि खरे स्वराज्य कशा प्रकारचा असू शकेल याची मांडणी केली. त्यांनी 'हिंदस्वराज्य' या ग्रंथामध्ये पर्यायी राजकरणाचे विचार मांडले आहेत.

महात्मा गांधींच्या 'हिंदस्वराज्य' या ग्रंथाचा विकास करून १९४० साली आचार्य विनाबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' हा ग्रंथ लिहीला. या ग्रंथात विनोबा भावे यांनी भांडवलशाहीला, संसदीय शासनपध्दतीला आणि राजनीतीला पर्यायी लोकनीती, साम्यवादाला पर्यायी साम्ययोग हे राजकीय विचार मांडले आणि अशा राजकीय संकल्पना विकसित केल्या आहेत.

महात्मा गांधी यांनी भारतामध्ये खरे स्वराज्य जर स्थापन करायचे असेल तर इंग्रजानी स्थापन केलेले आधुनिक संस्कृती, आधुनिक संसदीय शासन पध्दतीचे भारतीय लोकांनी अनुकरण करू नये असे मत मांडले. त्यांचे असे मत होते की, भारतीय लोकांनी जर इंग्रजाचे अनुकरण केले तर भारतामध्ये गोऱ्या साहेबांच्या ठिकाणी काळासाहेब येईल असे परीवर्तन त्यांना नको होते. खरेखुरे पर्यायी राजकारण त्यांना विकसीत करायचे होते. त्यासाठी त्यांनी सर्वोदयाची आणि ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली. आचार्य विनोबा भावे हे महात्मा गांधींचे वैचारीक शिष्य होते. आचार्यांनी गांधींच्या जवळ जवळ सर्वच संकल्पनांचा विकास केला. साम्ययोग, लोकनीती, सर्वोदय इत्यादी संकल्पना मांडल्या. 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात 'हिंदस्वराज्य' मध्ये जे पर्यायी राजकीय विचार मांडण्यात आलेले आहेत त्याचा विकास केला आहे.

या पर्यायी राजकीय विचारसरणीला 'पर्यायी गांधीवादी राजकारण' असे म्हणता येईल. या 'पर्यायी गांधीवादी राजकारण' विचारसणीचा प्रस्तुत प्रबंधामध्ये अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**<u>या विचारांच्या संशोधनाचे पुर्नविलोकन</u> :**

महात्मा गांधींजींचे जीवन आणि राजकीय तत्त्वज्ञान या विषयावर मोठयाप्रमाणामध्ये साहीत्य प्रकाशित झाले आहे. दर वर्षी अनेक पुस्तके, हजारो लेख प्रकाशित होतात. मात्र त्या प्रमाणामध्ये आचार्य विनोबा भावे यांच्या राजकीय विचारांचा आणि महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांच्यातील वैचारीक अनुबंधाचा त्याप्रमाणात अभ्यास झाला नाही. या दोघांच्या राजकीय विचारांच्या संदर्भामध्ये काही राजकीय विचारवंतानी लिखाण केले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील जेष्ठ गांधीवादी विचारवंत श्री. वसंत पळशीकर यांचा मुख्यत्वे समावेश होतो. त्यांनी या विषयावर विपुल असे लेखन केले आहे.

१) 'हिंदस्वराज्य' या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये जेष्ठ विचारवंत श्री. वसंत पळशीकर यांनी व्यापक स्वरूपात विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तावनेच्या सुरूवातीस 'हिंदस्वराज्या'चे आजच्या काळातील महत्त्व आणि 'हिंदस्वराज्य' पुस्तकाच्या लिखाणाची पार्श्वभूमी यासंबंधी चर्चा केली आहे.

'हिंदस्वराज्य' या ग्रंथात जेष्ठ विचारवंत श्री. वसंत पळशीकर यांनी विस्तृत अशा प्रस्तावनेमध्ये ग्रंथाचे पाच भागात विभाजन करून ग्रंथाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या भागात १८८५ ते १९०९ या काळातले कॉंग्रेसचे नेते व त्यांचे कार्य कशाप्रकारचे

होते. दुसऱ्या भागात स्वराज्य कशाला म्हणायचे आणि पाश्चात्य सभ्यतेचे वास्तविक दर्शन कशात आहे. तिसऱ्या भागात हिंदुस्थानचें पारतंत्र्य आणि इंग्रजी राज्याबरोबर आलेल्या सुधारणांचा घातक परिणाम कसा झाला याचे ही विवेचन केले आहे. चौथ्या भागात गांधींनी खऱ्या सभ्यतेची स्पष्टता कशा प्रकारे केली आहे आणि शेवटी पाचव्या भागात हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचा मार्ग कोणता? या संबंधी विवेचन केले आहे.(१)

या पाच भागातून जेष्ठ गांधीवादी विचारवंत वसंत पळशीकर यांनी प्रस्तावनेत या ग्रंथाचे विस्तृत असे अवलोकन करून त्यात नवा भाग कोणता हे सागितले आहे.

२) 'स्वदेशीनिष्ठ समुदाय : गांधीचा राज्यविषय विचार' या लेखात जेष्ठ विचारवंत श्री. वसंत पळशीकर यांनी महात्मा गांधींचे राज्यविषयक विचार हे आजच्या आणि उद्याच्या जगात कशा प्रकारे प्रस्तुत ठरतील यासंबंधीचा विचार केला. महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्याची कल्पना, विकेंद्रीत समाजाची मांडणी आणि 'हिंदस्वराज्य' मधील आधुनिक संसदीय लोकशाहीची केलेली चिकित्सा यांच्या संदर्भात या सर्व विचारसरणीचा आधुनिक राष्ट्र–राज्य जनतेच्या अपेक्षा कशाप्रकारे पुर्ण करीत नाही हे दाखवून दिले आहे.

गांधींजींना अभिप्रेत असलेली स्वदेशी तत्त्वानुसार राजकीय, आर्थिक पुर्नरचना आपोआप घडून येणार नाही. त्यासाठी राज्यसत्तेचे आक्रमण रोखून धरण्याची क्षमता विकसित करणारे स्वायत्त गाव, समुदाय बांधीत जाणे हेच त्या दिशेने जाण्याचे पहिले पाऊल आहे. भूदान–ग्रामदान आंदोलन ओसरल्यावर अशा समुदायांची बांधणी करण्याचे काम मागे पडल्यासारखे वाटते. आता पुन्हा गांधींच्या स्वदेशीचा विचार त्यांच्यामूळ अर्थासह स्वीकृत होण्याची गरज भासत आहे.(२)

अशाप्रकारे आजच्या राष्ट्र–राज्य संकल्पनेशी गांधींजींच्या राजकीय विचाराचे महत्त्व विषद करण्याचा प्रयत्न वसंत पळशीकर यांनी केला आहे.

३) 'स्वदेशी समाज आणि स्वराज्य' या लेखात जेष्ठ विचारवंत श्री. वसंत पळशीकर यांनी कविवर्य रविंद्रनाथ टागोर आणि महात्मा गांधी यांचे स्वराज्याच्या कल्पनेचे विवेचन केले आहे. त्यांनी महात्मा गांधी आणि रविंद्रनाथ टागोर यांचे 'स्वदेशी समाज आणि स्वराज्य' या विषयीचे विचार मांडलेले आहेत.

१९४७ साली भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. महात्मा गांधींच्या कल्पनेतले स्वराज्य आणि हे राजकीय स्वातंत्र्य यामध्ये जमीन आस्मानाचे अंतर आहे. कविवर्य रविंद्रनाथ टागोर यांची ही स्वराज्याची कल्पना वेगळी होती. 'हिंदस्वराज्य' या छोटेखानी पुस्तकामध्ये गांधींनी त्यांच्या स्वराज्याचा अर्थ विशद केला. टागोरांचे स्वराज्य विषयक विचार प्रथमतः त्यांनी १९०४ साली एका सार्वजनिक सभेपुढे सादर केलेल्या 'स्वदेशी समाज' या व्याख्यान विषयामधून स्पष्ट केले आहे. महात्मा गांधी आणि रविंद्रनाथ टागोर यांचे स्वराज्यविषयक विचार वसंत पळशीकर यांनी स्पष्ट केले आहेत.

भारतीय समाजाचे पुनरूत्थान म्हणजे काय आणि ते कसे व केव्हा घडून येईल, हा गांधी व टागोर या उभयतांच्या आस्थेचा व चिंतेचा विषय होता. खेडी आणि खेडूत यांच्या पुनरूत्थानाखेरीज भारतीय स्वातंत्र्य व स्वराज्य या दोन्ही गोष्टी निरर्थक आहेत, याबाबतीत टागोर व गांधी यांचे एकमत होते. तसेच स्वतःच्या इतिहास, परंपरा व संस्कृती यांच्याशी सातत्य राखूनच स्वराज्य संपादन करता येणार आहे असा दोघांचा अभिप्राय होता. सर्वसमावेशक निर्वैर ऐक्यावर, मनोमीलनावर टागोरांचा विशेष भर होता. गांधींचे

स्वदेशीनिष्ठ ग्रामस्वराज्य आणि टागोरांचे परस्पर सहकार्याधिष्ठित विश्वमानुषत्व यांच्यात अविरोध होता.(३)

नवसमाजनिर्मितीच्या चळवळीमधील आपण सर्वांनी रवींद्रनाथांकडून चालत येणाऱ्या या वारशाची जपणूक करायला हवी अशा शब्दात वसंत पळशीकरांनी या दोन महापुरूषांच्या स्वराज्य विषयक विचारांचे विश्लेषण केले आहे.

४) 'इंडियन आयडीया ऑफ फ्रिडम पॉलिटिकल थॉट ऑफ विवेकानंद, अरविंद घोष, रविंद्रनाथ टागोर ॲण्ड महात्मा गांधी' या पुस्तकामध्ये डेनिस डॉल्टन यांनी आधुनिक भारतामध्ये स्वातंत्र्याची संकल्पना कशी विकसित झाली या संबंधात चार प्रमुख भारतीय विचारवंतांच्या राजकीय आणि सामाजिक विचारसरणीचा परामर्श घेतला आहे.

प्रामुख्याने या पुस्तकाच्या महत्त्वपुर्ण भागात या चार महत्त्वाच्या विचारवंतांनी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे कसे विश्लेषण केले आहे यावर भर देण्यात आला आहे. महात्मा गांधींनी भारतीय राजकारण व समाजकारणात वावरत असताना कशा पध्दतीच्या संकल्पना व प्रयोगांचा उपयोग केला याचा ऊहापोह या पुस्तकामध्ये करण्यात आला आहे. तसेच इतर विचारवंतांनी ही (विवेकानंद, घोष, टागोर) या संदर्भात मोलाचे योगदान दिल्याचे नमूद केले आहे. थोडक्यात महात्मा गांधींनी भारतीय राष्ट्रीय चळवळीमध्ये क्रियाशील सहभाग घेतला होता व कोणताही सामाजिक, राजकीय बदल किंवा परिवर्तन नैतिकतेच्या माध्यमातूनच घडून येईल असा त्यांचा ठाम विश्वास होता. या सर्व बाबींचा समावेश उपरोक्त ग्रंथात लेखकाने सूत्रबध्द पध्दतीने केला आहे.(४)

५) ॲंथनी परेल या लेखकाने संपादीत केलेल्या महात्मा गांधी यांच्या 'हिंदस्वराज्य ॲण्ड ऑदर राईटिंग' या पुस्तकामध्ये पहिल्या विभागात महात्मा गांधींजींची मूळ प्रस्तावना दिलेली आहे. जी इतर कोणत्याही पुस्तकात आढळत नाही. तसेच ॲंथनी परेल यांनी गांधींजींच्या राजकीय आणि ऐतिहासिक कार्यावर प्रकाश टाकला आहे. तसेच त्यांनी महात्मा गांधींच्या इंग्लंडमधील आणि दक्षिण आफ्रिकेतील अनुभवांचे महत्त्व सांगितले आहे.

या पुस्तकातील दुसऱ्या विभागात महात्मा गांधींजींच्या इतर लिखाणाचा समावेश केलेला आहे आणि टॉलस्टॉय, नेहरू व इतर महत्त्वपुर्ण अशा व्यक्तिमत्त्वाशी त्यांनी साधलेला संवाद याचा सुध्दा समावेश यात केला आहे.

या संबंध पुस्तकामध्ये महात्मा गांधींचे ध्येय, आधुनिक सभ्यतेवरील त्यांची टीका, दक्षिण आफ्रिकेतील राजकारण, भारतातील देशभक्तांचे राजकारण, भारताची राष्ट्रीय चळवळ, 'हिंदस्वराज्य' मधील महात्मा गांधींचा संरचनात्मक दृष्टीकोन व युक्तीवाद आणि गांधी विचारांची प्रासंगिकता याचा ऐतिहासिक आढावा अतिशय माफक परंतु तर्कसंगत भाषेत मांडण्याचा प्रयत्न ॲंथनी परेल यांनी केला आहे.[५]

६) 'विनोबांचे स्वराज्यशास्त्र : अवलोकन आणि आकलन' या लेखात प्रा. सु. श्री. पांढरीपांडे यांनी आचार्य विनोबा भावे यांचे 'स्वराज्यशास्त्र' या पुस्तकाचे विवेचन अनेक मुद्दयांच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला आहे. 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' यामधील स्वातंत्र्य आणि स्वराज्य याबाबतची भूमिका स्पष्ट केली आहे. प्रा. सु. श्री. पांढरीपांडे यांच्या मते 'स्वराज्यशास्त्रा'ची रचना एखाद्या गणिताच्या पुस्तकाइतकी नेमकी आणि शास्त्रीय आहे. या

पुस्तकामधील सगळी मांडणी ही प्रश्नोत्तराच्या स्वरूपात आहे. म्हणून प्रा. पांढरीपांडे यांनी या पुस्तकाचे विवेचन हे सोदाहरण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

विनोबांनी स्वराज्यशास्त्रात राज्यव्यवस्थेचे तीन प्रकार सांगितले आहेत. एकायतन, अनेकायतन आणि सर्वायतन यात विनोबा यांना सर्वाच्या जबाबदारीची व्यवस्था म्हणजेच सर्वायतन ही व्यवस्था अपेक्षीत होती. या व्यवस्थांची प्रा. पांढरीपांडे यांनी चिकित्सक अशी मांडणी केली आहे.

विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात राजनीतीला लोकनीती हा पर्याय देऊन, अहिंसा हा सर्वायतन व्यवस्थेचा आत्मा आहे, त्यामुळे अहिंसक समाज स्थापन करणे, ग्रामराज्य आणि रामराज्य स्थापण करणे, साम्ययोगी समाज स्थापन करणे या विनोबांच्या विचारांचे विवेचन प्रा. पांढरीपांडे यांनी करण्याचा प्रयत्न केला आहे.[६]

७) 'स्वराज्य आणि राज्यसंस्था' या ग्रंथात थोर विचारवंत प्रा. राम बापट यांनी महात्मा गांधी, कार्ल मार्क्स आणि एम्. एन्. रॉय यांच्या स्वराज्य आणि राज्यसंस्था या विषयीच्या विचारांची मूलगामी चिकित्सा केली आहे.

अप्रत्यक्ष लोकशाहीतील उणीवा लक्षात घेऊनच कार्ल मार्क्स, महात्मा गांधी व मानवेंद्रनाथ रॉय यांनी संसदीय राजकारणाचा आणि प्रातिनिधिक लोकशाहीचा अव्हेर केला होता. महात्मा गांधींच्या शासनसंस्थेविषयक सिध्दांताचा उहापोह प्रा. राम बापट यांनी केला आहे. महात्मा गांधींचा स्वराज्याचा अर्थ हा लोकनीतीवर आणि समाजजीवनावर कसा आधारलेला आहे याचे विवेचन केले आहे. त्याच्या मते महात्मा गांधींना राजकारणाचे काठावर आधारलेले जे रूप आहे, ते नष्ट करायचे होते आणि खऱ्या अर्थाने माणसाला

स्वतंत्र करायचे होते आणि व्यक्तीचे बंधनरहीत पूर्ण स्वातंत्र्य हा त्यांच्या राजकीय विचारांचा आत्मा होता. परंतु हे स्वातंत्र्य व्यक्ती स्वतःच्या हितासाठी वापर करणार नाही तर, जगातील दुःखी लोकांचे दुःख दुर करून, नव्या संदर्भात मानवी संबंधाची पुर्नरचना करणे हे महात्मा गांधींच्या शासनसंस्थेविषयक विचारांचे मुख्य सूत्र होते असे मत प्रा. बापट यांनी व्यक्त केले आहे.

कार्ल मार्क्स व महात्मा गांधी यांच्या स्वराज्य विषयक विचारांची खोल अशी मीमांसा प्रा. बापट यांनी केली आहे. राज्य व नागरी समाज, अनासक्ती व सत्ता, शासनसंस्था व लोकशाही चळवळी आणि सिध्दांचे अधिकार व साधकाची साधना याबाबत प्रा. बापट यांनी काहीशी नव्याने मांडणी केली आहे.(७)

८) 'महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास आणि अन्वयार्थ' या पुस्तकात महाराष्ट्रा मध्ये महात्मा गांधींच्या विचारांचा विकास कशा प्रकारे झाला. त्यांच्या विचारांचा अन्वयार्थ कशा प्रकारे लावण्यात आला याचे विवेचन करणारे निबंध समाविष्ठ करण्यात आले आहेत.

वसंत पळशीकर यांनी आपल्या निबंधामध्ये आचार्य विनोबा भावे यांच्या राजकीय विचारांची सूक्ष्म अशी मीमांसा केली आहे. पळशीकरांच्या मते गांधीच्या मृत्यूनंतर गांधीवादी विचारांचा, पर्यायी गांधीवादी राजकीय विचारांचा विकास करण्याचा वारसा विनोबांकडे आला. गांधींची चळवळ पुढे नेत असताना, ती चळवळ जनतेमध्ये कशाप्रकारे जुळलेली राहील आणि तिच्यामधून पर्याय विकासाचे प्रतीमान कशाप्रकारे विकसित करता येईल याची मांडणी विनोबांनी केली. विनोबांच्या मते या सर्व चळवळी शासकीय सत्तेपासून आणि

शासकीय अनुग्रहापासून दूर राहीली पाहीजे, चळवळीला खरी उर्जा जनतेकडून मिळाली पाहीजे, असे विवेचन वसंत पळशीकर यांनी केले आहे.

यापुस्तकात डॉ. अशोक चौसाळकर यांनी संपादक या नात्याने महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास आणि अन्वयार्थ लावण्यातचा खऱ्या अर्थाने प्रयत्न केला आहे.[८]

प्रस्तुत प्रबंधामध्ये महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या राज्यविषयक संकल्पनांचा टिकात्मक अभ्यास करणार आहे. काही पुस्तकांचा आणि लेखांचा परामर्श घेतला. वरील पुर्नविलोकनांमधून एक गोष्ट स्पष्ट होते की, पळशीकरांचा अपवाद वगळता इतर विचारवंतानी 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' यांच्यातील परस्पर संबंधाची सविस्तर अशी चर्चा केलेली नाही. या दोन्ही पुस्तकामध्ये पर्यायी राजकारणाची मीमांसा करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रबंधामध्ये या दोन्ही पुस्तकांच्या आधारे गांधीवादी राजकारण कसे मांडण्यात आले यांचे विवेचन करण्यात आले आहे.

**अभ्यासाची उद्दीष्टे :**

प्रस्तुत संशोधनाची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे :

१) महात्मा गांधींजींनी 'हिंदस्वराज्य' या ग्रंथात मांडलेल्या राजकीय विचारांमध्ये पर्यायी राजकारणाची बीजे आहेत, यांचा अभ्यास करणे.

२) आचार्य विनाबा भावे यांच्या 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथांत मांडलेला राजनीतीला लोकनीती हया पर्यायी राजकारणाचा अभ्यास करणे.

३) महात्मा गांधींनी 'हिंदस्वराज्य' या ग्रंथामध्ये मांडलेले पर्यायी विचार विकसीत करून विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात मांडले. ते विचार आधुनिक समाजाला कसे पर्यायी व्यवस्था उपलब्ध करतील याचा अभ्यास करणे.

४) 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथातील पर्यायी राजकारणाच्या विचारांचा तुलनात्मक व टीकात्मक अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती :

'पर्यायी गांधीवादी राजकारण हिंदस्वराज्य ते स्वराज्यशास्त्र' या प्रबंधाच्या संशोधनासाठी ऐतिहासिक पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत प्रबंधामध्ये 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' या दोन पुस्तकातील पर्यायी राजकारणाची बीजे यांचा अभ्यास केला जाईल. 'हिंदस्वराज्य' मधील पर्यायी राजकीय विचारांचा विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात कशाप्रकारे विकास केला याचे विश्लेषण आणि विवेचन केले आहे.

या अभ्यासात महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांनी लिहीलेले ग्रंथ, पत्रव्यवहार, भाषणे यांचा अभ्यास केला आहे. त्याच बरोबर दुय्यम साधनात अनेक विचारवंतानी लिहीलेले ग्रंथ, लेख, शोधनिबंध यांचा ही अभ्यास केला आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१) पळशीकर वसंत – 'हिंदस्वराज्य' प्रस्तावना, परंधाम प्रकाशन, पवनार, १९९८.

२) पळशीकर वसंत – 'स्वदेशीनिष्ठ समुदाय : गांधींचा राज्यविषयक विचार', साम्ययोग, ऑक्टोबर १९९२, पृ.क्र. ३,४

३) पळशीकर वसंत – 'स्वदेशी समाज आणि स्वराज्य' आंदोलन–शाश्वत विकासासाठी, ऑक्टोबर २००२, पृ. क्र. 1, २

४) डेल्टॉन डेनिस – 'इंडियन आयडिया ऑफ फ्रिडम', अॅकॅडेमिक प्रेस, गुरगांव, हरीयाना, १९८२.

५) परेल अँथनी – 'हिंदस्वराज्य अॅन्ड अदर रायटींग्ज', केंब्रिज युनिर्व्हसिटी प्रेस, १९९७.

६) पांढरीपांडे सु. श्री. – 'विनोबांचे स्वराज्यशास्त्र : अवलोकन आणि आकलन', नवभारत, नोव्हेंबर २००२, पृ. क्र. ३९, ५६

७) बापट राम – 'स्वराज्य आणि राज्यसंस्था', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००३.

८) डॉ. चौसाळकर अशोक (सं.) –'महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास आणि अन्वयार्थ', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००३, पृ. क्र. ४.